# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 11.09.2026** **वार : शुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

1. '18 व्या ब्रीक्स शिखर परिषदे'चं उद्यापासून दिल्लीत आयोजन, परिषदेत सहभागासाठी रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन दिल्लीत दाखल.
2. भारताच्या आर्थिक विकासदराबाबत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून प्रशंसा.
3. नोकरी सुटल्यानंतरही, एच वन बी व्हिसावर अमेरिकेत राहाण्याची मुभा; रद्द करण्याचा ट्रम्प प्रशासनाचा प्रस्ताव.
4. महाराष्ट्रात भंडारा जिल्ह्यात आज पहाटे झालेल्याभीषण अपघातात 8 जणांचा मृत्यू .
5. आशिया चषक टी-20 महिला क्रिकेट स्पर्धेत भारताची अंतिम फेरीत धडक.

**सविस्तर बातम्या**

**ब्रिक्स परिषद**

दिल्लीत उद्यापासून 18व्या ब्रिक्स परिषदेचं आयोजन करण्यात आलं असून त्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. या परिषदेत भारतासह ब्राझील, चीन, इजिप्त, इथोपिया, इंडोनेशिया, इराण, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण अफ्रिका आणि संयुक्त अरब अमिराती या देशांचा सहभाग असेल. भारताच्या अध्यक्षतेखाली अनुकूलन, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या विषयसूत्रावर आधारित ही परिषद होत आहे. सहभागी बहुतांश राष्ट्रांचे राष्ट्राध्यक्ष तर काही देशांचे उच्चाधिकारी या परिषदेत सहभागी होणार असून, रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन आणि ब्राझीलचे परराष्ट्र मंत्री यांचं काल रात्री दिल्लीत आगमन झाले आहे. त्याशिवाय संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस, जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक ट्रेडोस घेब्रोयेसूस आणि न्यू डेव्हलपमेंट बँकेच्या अध्यक्षा दिल्मा रुसेफ हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघटनाप्रमुख सहभागी होणार आहेत.

परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय मोदी अनेक राष्ट्रांशी द्विपक्षीय चर्चा करण्याची शक्यता आहे.

दरम्यान, उद्यापासून रविवार पर्यंत राष्ट्रपती भवन, राष्ट्रपती भवन संग्रहालय आणि अमृत उद्यान बंद राहाणार आहेत. शिवाय राष्ट्रपती सचिवालयाने दिलेल्या माहितीनुसार, उद्या राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात होणारा 'चेंज ऑफ गार्ड सोहळाही होणार नाही.

परिषदेच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये रस्ते मार्गांमध्ये काही बदल करण्यात आले आहे. मेट्रो स्थानके पुढील सूचनेपर्यंत सुरू राहाणार असल्याचं दिल्ली पोलिसांनी म्हटलं आहे. त्यासह दिल्लीत रविवारपर्यंत उच्च न्यायालयं, जिल्हा न्यायालये तसंच कनिष्ठ न्यायालये बंद राहणार आहेत.

**राष्ट्रपती-आगा खान-भेट**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्कचे अध्यक्ष आणि समाजसेवक पाचवे प्रिन्स रहीम आगा खान यांची भेट घेतली. राष्ट्रपतींनी आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्कने पाणी आणि स्वच्छता, शिक्षण, माता आरोग्य, शहरी पुनर्विकास, महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मिती यासारख्या क्षेत्रात केलेल्या कामाचे कौतुक केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही रहीम आगा खान यांची भेट घेतली. सामाजिक विकास, सिंचन, सहकार क्षेत्र, नैसर्गिक शेती आणि सौर ऊर्जा या क्षेत्रांमधील सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत या भेटीत चर्चा झाली.

**नड्डा-आरोग्य**

आरोग्याची बळकट, लवचीक आणि न्याय व्यवस्था उभारण्याच्या सामूहिक प्रयत्नांमध्ये आणि प्रादेशिक भागीदारी बळकट करण्यासाठी योगदान देण्यास भारत वचनबद्ध असल्याचा पुनरूच्चार केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी केला. जागतिक आरोग्य संघटनेने, तिमोर लेस्ते येथील दिली इथं आयोजित आग्नेय आशियाच्या प्रादेशिक समितीच्या 79 व्या सत्राला दूरदृश्य प्रणालीद्वारे नड्डा यांनी संबोधित केले त्यावेळी ते बोलत होते. या अधिवेशनात भारताला जागतिक आरोग्य संघटनेच्या 'आग्नेय आशिया प्रादेशिक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान भारताच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील कामगिरीची दखल घेणारा असल्याचं नड्डा यांनी नमूद केलं.

**जीएफएफ**

मुंबईत सुरू असलेल्या सातव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचा समारोप आज होणार आहे. सर्वसमावेश वित्तपुरवठ्यासाठी विश्वसनीय, परस्परांशी निगडीत जागतिक प्रणाली असे या उपक्रमाचे विषयसूत्र होते. केंद्रीय अर्थ आणि व्यावसायिक व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय मंत्री नीतिन गडकरी आज या परिषदेला संबोधित करणार आहेत.

**अमेरिका हल्ला**

अमेरिकेतील ट्वीन टॉवरवरील दहशतवादी हल्ल्याला आज 25 वर्ष पूर्ण होत आहेत. या हल्ल्यात 3 हजार जणांचा बळी गेला होता. या घटनेच्या स्मृतिप्रीत्यर्थ अमेरिकेत विविध कार्यक्रम आणि श्रद्धांजली सभा आयोजित केल्या जात आहेत.

**शिवराज सिंह**

नव्या बियाणांच्या संदर्भात नव्या प्रस्तावित कायद्यांतर्गत शेतकऱ्यांचे हक्क पूर्णपणे सुरक्षित राहातील आणि पारंपरिक तसंच शेतकऱ्यांनी विकसित केलेल्या बियाणांच्या वाणावर कोणतेही निर्बंध आणले जाणार नाहीत अशी ग्वाही केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. दिल्लीत काल देशभरातील शेतकरी संघटनेच्या नेत्यांसमवेत प्रस्तावित कायद्यासंदर्भात चर्चेचं आयोजन सिंह यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलं होतं. त्यावेळी ते बोलत होते. प्रस्तावित कायद्यात स्थानिक परिस्थितीनुरूप अनुकूल नवीन वाण बाजारात आणण्याचे अधिकार राज्यांना असल्याचं सांगून राष्ट्रीय मानकेही लागू होणार असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**नाणे निधी**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजे आयएमएफनं भारताला जागतिक विकासाचं प्रमुख इंजिन असं म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताच्या आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 8 दशांश टक्के नोंदवल्यानंतर नाणेनिधीनं ही प्रतिक्रिया दिली. इंधन आणि ऊर्जेच्या किमतींमधील अचानक झालेल्या वाढीचा सामना करावा लागूनही, सेवा क्षेत्र आणि निर्यातीमुळे भारतानं अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली, असं नाणेनिधीच्या संपर्क विभागाच्या संचालिका जुली कोझाक यांनी सांगितलं.

**H1B व्हिसा**

नोकरी सुटल्यानंतरही, एच वन बी व्हिसावर राहाणाऱ्या कामगार आणि रोजगारावर आधारित व्हिसावर राहाणाऱ्या व्यक्तींना अमेरिकेत राहाण्याची मुभा देणारा दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी रद्द करण्याचा प्रस्ताव ट्रम्प प्रशासनाने मांडला आहे. या प्रस्तावामुळे नवीन रोजगारदाता अथवा स्थलांतराचा दुसरा पर्याय निवडण्याचा कालावधी कमी होऊ शकतो. डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटीजने दिलेला हा प्रस्ताव आज फेडरल रजिस्टरमध्ये प्रकाशित होणार असून, त्याद्वारे काही व्हिसा श्रेणी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठीची तरतूद रद्द होणार आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास, नोकरी संपुष्टात आल्यानंतर अन्य कोणतीही अधिकृत परवानगी नसल्यास देश ताबडतोब सोडावा लागणार आहे.

**युवा संसद**

संसदीय लोकशाही ही जगातील सर्वोत्तम शासन प्रणाली असल्याचं प्रतिपादन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे. संसद भवनात 27 व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा 2025-26 चे पुरस्कार रिजीजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. या स्पर्धेत मणिपूरमधील शिलाँग विभागातील 'पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, उखरुल-1' हे राष्ट्रीय विजेते ठरले.

**आग-अपघात**

पूर्व काँगोमधील बुकावू शहरात 2 शाळांमध्ये लागलेल्या आगीत किमान 26 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून सुमारे 12 जण जखमी झाले आहेत अशी माहिती दक्षिण किवू प्रांतीय प्रशासनानं दिली आहे. एका घरात लागलेली आग नंतर लगतच्या दोन शाळांपर्यंत पसरली अशी प्राथमिक माहिती आहे. ज्या भागात आग लागली तो भाग दाट लोकवस्तीचा असून तिथली बहुतांश घरे लाकडापासून बनलेली आहेत.

**अपघात-भंडारा**

महाराष्ट्रात भंडारा जिल्ह्यात आज पहाटे झालेल्याभीषण अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला; तर तीन जण गंभीर जखमी झाले. नागपूर-रायपूरराष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव सडक इथं ट्रक आणि पिकअप व्हॅनमध्ये जोरदार धडक झाली. मृतांमध्ये तीन लहान बालकांचाही समावेश आहे. जखमींना उपचारासाठी साकोली इथल्याउपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

**पॅरा-शूटिंग**

दक्षिण कोरियातल्या चांगवॉन इथं सुरू असलेल्या दिव्यांगांच्या जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत काल पहिल्याच दिवशी भारतानं एक सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावत दमदार सुरुवात केली. मोना अग्रवाल, अवनी लेखरा आणि मिली शाह यांनी एअर रायफल स्टँडिंग सांघिक प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. वैयक्तिक प्रकारात मोना अग्रवालनं रौप्यपदक, तर अवनी लेखरानं कांस्यपदक जिंकलं. या कामगिरीमुळे, 2028 च्या लॉस एंजेलिस पॅरालिम्पिक स्पर्धेत स्थान निश्चित करणारी मोना अग्रवाल पहिली भारतीय नेमबाज ठरली आहे. पुरुष गटात, राकेश निदागुंडी, आनंद कृष्ण आणि स्वरूप उन्हाळकर यांनी सांघिक प्रकारात दुसरे स्थान मिळवत रौप्यपदक पटकावलं.

**महिला क्रिकेट**

दुबईत काल रात्री झालेल्या 20 षटकांच्या आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात, भारतानं बांगलादेशचा 40 धावांनी पराभव केला. या विजयामुळे भारताचं अंतिम सामन्यातील स्थान निश्चित झालं आहे. भारतानं दिलेल्या 150 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशला निर्धारित 20 षटकांत 7 गडी गमावून केवळ 109 धावा करता आल्या. 40 चेंडूत 64 धावांची खेळी करणारी भारताची शफाली वर्मा 'सामनावीर' ठरली. दूसरा उपांत्य सामना आज श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यात होणार आहे. विजेत्या संघाचा सामना रविवारी होणाऱ्या अंतिम फेरीत भारताबरोबर होईल.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.